आपल्या परिसरातील ताज्या घडामोडींसाठी
Deshdoot Media Group
आजच डाऊनलोड करा, देशदूतचे मोबाईल ॲप!
ॲप डाऊनलोड करण्यासाठी
क्यूआर कोड स्कॅन करा!


# देशदूत

शिल्पकार विकासाचा...

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५६ | अंक १९५ | शनिवार, दि. २२ मार्च २०२५ | पाने १२+४ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर



पान २

गट संसाधन केंद्राचा कायापालट

सेवा हमी कायद्याचे १५ कोटी अर्ज निकाली

मुख्यमंत्र्यांच्या नाशिक दौऱ्यासाठी प्रशासनाची लगबग

शेवटचे पान

गोदावरी संवर्धनाची जबाबदारी नागरिकांनीही घ्यावी

पाण्याची गुणवत्ता कशी मोजतात?

सांडपाणी नदीत, याला जबाबदार कोण?


## संपादकीय

### ज्ञान आणि अनुभव हाच उपाय

राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये बारा हजार चारशे त्र्याहत्तर सरपंचपदे महिलांसाठी राखीव जाहीर झाली आहेत. २०३० पर्यंत हे आरक्षण कायम राहणार आहे. राजकारणात समाजाच्या सर्व स्तरातील महिलांना नेतृत्व करण्याची आणि विकासाच्या राजकारणासाठी महिला सत्तेचा प्रभावी वापर उत्तम करू शकतात याची संधी आरक्षण देते. महिला तुलनेने अधिक संवेदशील समस्या समजावून घेऊ शकतात. पाणी, आरोग्य, बचत, महिलांसाठी सामाजिक सुरक्षित वातावरण, सार्वजनिक स्वच्छतागृहे असे महिलांच्या दृष्टिकोनातून संवेदनशील समस्यांचे गांभीर्य त्यांच्यापेक्षा अधिक सखोल कोण समजावून घेऊ शकेल? सत्तेचा वापर असे अनेक प्रश्न धसास लावण्यासाठी महिला करू शकतील. सद्यस्थितीत अनेक जण स्वतःला सिद्ध करण्यासाठी प्रयत्न करतात. पद मिळण्यावर समाधान न मानता समज वाढवण्यासाठी संघर्ष करतात. तथापि सामान्य स्तरावर वास्तव वेगळे आढळते. वास्तविक समाज आणि कौटुंबिक बळ महिलांचा राजकारणातील प्रवास अधिक समृद्ध करू शकते. पण अनेकींचे घोडे नेमके इथेच पेंड खात असावे. छत्तीसगढमध्ये उघडकीस आलेली घटना याबाबतीत प्रातिनिधिक ठरू शकेल. छत्तीसगढ कबीरधाम जिल्ह्यात परसवारा ग्रामपंचायतीत सहा महिला निवडून आल्या. तथापि त्यांच्याऐवजी त्यांच्या पतींनीच शपथ घेतल्याचे प्रसिद्ध झालेल्या वृत्तात म्हटले आहे. त्याचा व्हिडिओदेखील फिरत आहे. महाराष्ट्रातही महिला प्रतिनिधींच्या पतींची लुडबूड अधिकाऱ्यांची डोकेदुखी ठरत असू शकेल. तात्पर्य, कायद्याने दिलेल्या राजकीय आरक्षणाच्या संधीचे महिलांनी सोने करण्यासाठी पुरुषप्रधान मानसिकता आणि महिलांनाही पुरुषप्रधान मानसिकतेतून स्वतःकडे बघण्याची जडलेली सवय हा मोठाच अडथळा आहे. अनेकदा या आरक्षणाचा फायदा घेण्यासाठी राजकीय कुटुंबातील महिलांनाच निवडणुकीत उभे केले जाते. निवडून आली तरी अशी महिला 'डमी' लोकप्रतिनिधी ठरू शकते. तशी उदाहरणे आढळतातदेखील. तिच्याऐवजी तिच्या कुटुंबातील पुरुषच कारभार हाकताना आढळतात. अर्थात काहीजणी सगळ्या प्रकारच्या प्रतिकूलतेला शब्दशः पुरून उरतात. पण त्यांची संख्या अपवादात्मकच आढळते. तेव्हा महिला आरक्षणमागचा उद्देश साध्य होण्यसासाठी पुरुषांना त्यांच्या मानसिकतेत बदल करावे लागतील. महिलांच्या क्षमतेवर विश्वास ठेवावा लागेल. त्यांचे स्वतंत्र अस्तित्व मान्य करावे लागेल. ती जबाबदारी महिलांचीदेखील आहे. पंचायत राज मंत्रालयाने 'पंचायत राज व्यवस्था आणि संस्थांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व आणि भूमिका बदलणे : प्रॉक्सी सहभागाचे प्रयत्न दूर करणे' या विषयावर ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. त्यांच्या समितीने सरकारला अहवाल सादर केला आहे. त्यांनी उपरोक्तसह अशा अनेक समस्यांची दखल घेतली आहे. तथापि संधीचे सोने करण्यातील महिलांजवळ पुरेसे ज्ञान आणि अनुभवाचा अभाव याकडेही लक्ष वेधून घेतले आहे. ते मिळण्यातही पुरुषप्रधानता हाच अडथळा आहे हे खरे. पण असे अडथळे दूर करण्यासाठी महिलांनाही पुढाकार घ्यावा लागेल. ज्ञान आणि अनुभव कमवावा लागेल. हाच संदेश छत्तीसगढ घटनेने दिला आहे.

# दहशतवाद, नक्षलवाद वारशाने मिळाले : शहा

## राज्यसभेत विरोधकांवरही हल्लाबोल

**नवी दिल्ली | वृत्तसंस्था**



अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या आठव्या दिवशी आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी गृहमंत्रालयाच्या कामकाजावरील चर्चेला उत्तर दिले. दहशतवाद, नक्षलवाद व अतिरेकी हे एक रोग आहेत. आम्हाला ते वारशाने मिळाले असून आम्ही त्याचा सामना केला. १० वर्षांत बरेच काही बदलले असे म्हणत शहा यांनी विरोधकांवरही हल्लाबोल केला.

चर्चेदरम्यान काही उपयुक्त सूचना आल्याचे शहा म्हणाले. आमच्या कमतरता दाखवून दिल्या. काही राजकीय टिप्पण्याही केल्या गेल्या. शहा म्हणाले की, आमच्या सरकारने अतिरेकीपणा, दहशतवाद आणि नक्षलवादाला धक्का दिला आहे. कलम ३७० हटवल्यानंतर जम्मू आणि काश्मीरमध्ये झालेल्या प्रगतीचाही त्यांनी उल्लेख केला. गृहमंत्र्यांनी काश्मीरमधील कलम ३७० हे वेगळे होण्याचे मुख्य कारण असल्याचे सांगितले. शहा म्हणाले की, कलम ३७० हटवल्यानंतर काश्मीरमध्ये दहशतवादाच्या घटना कमी झाल्या आहेत. दगडफेकही थांबली आहे. २०२४ मध्ये काश्मीरमध्ये दगडफेकीची एकही घटना घडलेली नाही. आम्ही काश्मीरमध्ये बंद असलेले चित्रपटगृहे उघडली. तिथे जी-२० बैठक आयोजित करण्यात आली होती. आम्ही पठाणकोटमधील चेकपोस्ट परवाना रद्द केला आहे. जम्मू आणि काश्मीरमध्ये भ्रष्टाचारविरोधी ब्यूरोची स्थापना करण्यात आली. पूर्वीच्या सरकारांचा दृष्टिकोन शिथिल होता आणि भ्रष्टाचार रोखण्यासाठी कोणताही कायदा नव्हता, आता काश्मीरमध्ये भ्रष्टाचाराचे प्रमाण जवळजवळ शून्य आहे. पूर्वी दहशतवाद्यांच्या मृत्यूवर मिरवणुका काढल्या जात होत्या. पण आमच्या सरकारने ते बंद केले. उरी हल्ल्याचा बदला दहा दिवसांत घेण्यात आला. दहशतवाद्यांच्या कुटुंबातील सदस्यांना नोकऱ्या देणे बंद केले, असेही शहा म्हणाले.

### एका वर्षात ३८० नक्षलींचा खात्मा

ईशान्येकडील राज्यांमध्ये हिंसाचाराच्या घटना कमी झाल्या आहेत. गृहमंत्र्यांनी नक्षलवाद्यांना संपवण्याच्या आपल्या वचनाचा पुनरुच्चार केला. एका वर्षात २६१९ नक्षलवादी कमी झाले आहेत. एका वर्षात ३८० नक्षलवाद्यांना मारले आहे. आता फक्त १२ जिल्हे नक्षलग्रस्त आहेत.१०४५ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. नक्षलवाद्यांच्या आर्थिक मदतकर्त्यांचा खात्मा आम्ही केला आहे, असे अमित शहा म्हणाले.

### राऊतांकडून औरंगजेब कबरीचा मुद्दा

राज्यात गेल्या काही दिवसांपासून पेटलेला औरंगजेबच्या कबरीचा मुद्दा शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी आज राज्यसभेत उपस्थित केला. यावेळी ते म्हणाले, मणिपूरनंतर महाराष्ट्र जळत आहे, नागपूरमध्येही दंगली होत आहेत. गृहमंत्रालयाने गेल्या काही वर्षांत देशाला पोलीस स्टेट बनवले आहे. याचबरोबर संजय राऊत यांनी केंद्र सरकारला औरंगजेबची कबर तोडण्याचे आव्हान दिले व औरंगजेबाची कबर तोडण्यासाठी तुमच्या परदेशात शिकत असलेल्या मुलांना पाठवा असेही म्हटले. राऊत यांच्या या भाषणावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहादेखील सभागृहात उपस्थित होते. गृहमंत्रालयाच्या कामकाजावरील चर्चेत सहभागी होत राऊत यांनी सरकारवर टीका केली. त्यांनी आरोप केला की, देशाला अस्थिर करण्याचा प्रयत्न करणाऱ्या शक्ती वारंवार औरंगजेबाचे नाव घेत आहेत, ज्यामध्ये महाराष्ट्र सरकारमधील मंत्री आणि केंद्र पान १० वर

# अग्नितांडव!



## पिंपळगावी २० दुकाने, गोडाऊन बेचिराख

- अग्निशमन बंबांच्या ९० फेऱ्या
- तीन तासांनंतर नियंत्रण

**पिंपळगाव बसवंत | दि.२१ वार्ताहर**

आशिया खंडातील सर्वात मोठी कांदा बाजारपेठ असलेल्या पिंपळगाव बसवंत येथे मुंबई-आग्रा महामार्गालगत बाबा मंगल कार्यालयासमोर खासगी जागेवर फोटोफ्रेम, शेती उपयोगी साहित्य, पॅकिंग मटेरियल, गॅरेज, भंगार दुकान, बांबूची वखार, कांदा शेड, रद्दी पेपरची दुकाने, गोडाऊन, व्यावसायिक आस्थापना असलेल्या १५ ते २० दुकानांना आज सकाळी आग लागून कोट्यवधींचे नुकसान झाले. नाशिक, ओझर, निफाड, दिंडोरी, देवळा, मालेगाव आदी ठिकाणचे अग्निशमन बंब दाखल झाले होते. आगीचे स्वरूप फारच भयानक असल्याने आग आटोक्यात आणण्यासाठी बंबांना तीन तास लागले. यासाठी बंबांना ९० फेऱ्या कराव्या लागल्या.

सकाळी ११ वाजेच्या सुमारास भेळभत्ता बनवणाऱ्या गोडाऊनला अचानक आग लागल्याने येथील सर्व व्यवसायिकांची दुकाने आगीत वेढली गेली. ही आग परिसरातील इतर दुकाने आणि वखारीपर्यंत पोहोचल्याने आगीच्या उंच ज्वाळा दिसत होत्या. धूर आणि जाळांनी परिसर व्यापून गेल्याने दुकानदारांची धावपळ उडाली. आग लागल्याचे कळताच पिंपळगाव बसवंत अग्निशमन दलाचे दोन्ही बंब तातडीने घटनास्थळी दाखल झाले. परंतु आगीचे रौद्र रूप बघता आगीने क्षणार्धात आसपासच्या सर्व दुकानांना वेढल्याने तसेच सर्व दुकाने ही पत्र्याची असल्याने आगीने काही क्षणातच मोठा पेट घेतला. शेजारी रद्दी तसेच बांबूची वखार असल्याने आगीने रौद्र रूप धारण केले. सुदैवाने या आगीत कुठलीही जीवितहानी झाली नाही. मात्र कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले. खासगी जागेत केवळ भाड्यासाठी पत्र्याचे गाळे बनवून देत विविध व्यवसायांसह ज्वलनशिल वस्तू विक्रीच्या व्यवसायिकांना जागा दिल्याने या ठिकाणी आगीची ही दुसरी घटना घडली आहे, अशी चर्चा घटनास्थळी होती. सकाळी ११ वाजेपासून ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत जवळपास ९० फेऱ्या बंबांच्या झाल्या.

# आग्र्यात शिवरायांचे स्मारक उभारणार

## जबाबदारी पर्यटन विभागाकडे

**मुंबई | वृत्तसंस्था**

आग्र्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारण्यात येणार असल्याची राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेली घोषणा आता प्रत्यक्ष अमलात येणार आहे. आग्र्यातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाबाबत महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय जारी केला आहे. आता या स्मारकाच्या उभारणीसाठी कार्यान्वयीन व निधीची जबाबदारी राज्याच्या पर्यटन विभागाकडे देण्यात आली आहे. या निर्णयामुळे भव्य स्मारकाच्या उभारणीस येत्या काळात गती लाभणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज आग्र्यातील ज्या ठिकाणी कैद राहिले ती जागा महाराष्ट्र सरकार उत्तर प्रदेश सरकारकडून अधिग्रहीत करणार आहे. या जागेवर शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारले जाणार पान १० वर

### समिती स्थापणार

स्मारक उभारणीसाठी पर्यटन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली इतिहासतज्ज्ञ तसेच जाणकार, तज्ज्ञांची समिती स्वतंत्रपणे स्थापन करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी निधी उपलब्धता, जमीन अधिग्रहण व अनुषंगिक बाबींकरता पर्यटन विभागाला जबाबदारी देण्यात आली आहे.

# फडणवीस-पटोले यांच्यात जुंपली



## मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणाचा मुद्दा विधानसभेत गाजला

**मुंबई | प्रतिनिधी**

गेल्यावर्षी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारने जाहीर केलेल्या मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेच्या मुद्यावरून शुक्रवारी विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि काँग्रेसचे नाना पटोले यांच्यात आव्हान-प्रतिआव्हानाचा सामना रंगला. मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेच्या अंतर्गत ज्या बेरोजगार तरुणांना राज्य सरकारच्या विविध विभागात घेण्यात आले आहे, त्यांना सेवेत कायम करण्याचे आश्वासन निवडणुकीत महायुती सरकारच्या वतीने देण्यात आले होते, असा दावा नाना पान १० वर

### बेरोजगारांना अनुभवासाठी योजना

हे प्रशिक्षण आधी सहा महिन्यांचे होते नंतर ते ११ महिने करण्यात आले. या बेरोजगार तरुणांना अनुभव मिळावा म्हणून ही योजना आणली होती. त्यामुळे या उमेदवारांना सेवेत सामावून घेण्याची मागणी न्यायालयातसुद्धा टिकणार नाही. त्यांची मागणी मान्य केली तर महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाला काही अर्थ राहणार नाही, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले.

# हाल करून गर्भवतीची हत्या

## इनकॅमेरा उत्तरीय तपासणीतून निष्कर्ष; पोलिसांनी पिंजून काढले घटनास्थळ

**नाशिक| प्रतिनिधी**

घराजवळील जंगलात सरपण आणण्यासाठी गेलेल्या गर्भवती महिलेचा अनोळखी संशयितांनी जबर मारहाण करून छळ करत, गळा आवळून निर्घृण खून केला. ही घटना पेठ तालुक्यातील रुईपेठ येथे घडली. पीडितेचा घातपात किंवा सामूहिक बलात्कार केल्याचा दावा काही संघटनांनी केल्यावर ओरड उठताच जिल्हा रुग्णालयाने एका समितीसमक्ष इनकॅमेरा शवविच्छेदन केले. त्यात हा धक्कादायक प्रकार उघड झाला. अहवाल मिळताच ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.

रुईपेठ येथील २१ वर्षीय गर्भवती सरपण आणण्यासाठी जंगलात गेली होती. गंभीर जखमी झाल्याने तिला गुरुवारी (दि.२०) जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान शुक्रवारी रात्री तिचा मृत्यू झाला. दाखल एमएलसीनुसार पाय घसरून पडल्याने ती जबर जखमी झाल्याचे कळवण्यात आले. तर काही सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींनी पीडित गर्भवतीचा घातपात झाल्याचा संशय वर्तवला. त्यामुळे महिलेचे शवविच्छेदन इनकॅमेरा करण्यात आले. सहा सदस्यीय तज्ज्ञ समितीत दोन महिला गायनॅकोलॉजिस्ट, सर्जन, फिजिशियन, फॉरेन्सिक एक्स्पर्ट, पोलीस अधिकारी तसेच चमूने, तज्ज्ञ समितीने महिलेचे शवविच्छेदन केले. त्यात तिला जबर मारहाण करून पोटात लाथा मारून ही हत्या केल्याचे उघड झाले. तसेच खबरदारी म्हणून महिलेचा व्हिसेरा राखीव ठेवण्यात आला आहे. त्यामुळे आता पोलीस चौकशी केली जाणार आहे.

# निरक्षर आजी-आजोबांची उद्या परीक्षा

## राज्यात आठ लाख तर जिल्ह्यात साडेचौदा हजार होणार साक्षर

**नाशिक | प्रतिनिधी**

आता घरातील निरक्षर आजी-आजोबांची परीक्षा रविवारी (दि.२३) होणार आहे. राज्यातील आठ लाख तर नाशिक जिल्ह्यातील साडेचौदा हजार निरक्षर हे परीक्षा देणार आहेत.

नवभारत साक्षरता कार्यक्रमातून शिक्षणाचे धडे गिरवणाऱ्या या प्रौढांची उद्या प्रत्येक जिल्ह्यात परीक्षा घेतली जाणार आहे. राज्यात सध्या आठ लाख प्रौढ या परीक्षेला बसणार आहेत. केंद्र पुरस्कृत नवभारत साक्षरता कार्यक्रमात गेल्या वर्षभरापासून अशा निरक्षरांची नोंदणी आणि त्यांचा अभ्यास वर्ग सुरू आहे. आता त्यांची परीक्षा घेऊन त्यांना साक्षर झाल्याचे प्रमाणपत्र मिळणार आहे. विशेष म्हणजे मागील वर्षी झालेल्या या परीक्षेतून सुमारे पाच लाख प्रौढांनी 'साक्षर झाल्याचा' आनंद घेतला होता. आता आणखी आठ लाख आजी-आजोबांना हा आनंद मिळणार आहे.



राज्यात हा कार्यक्रम योजना शिक्षण संचालनालयामार्फत सुरू आहे. शिक्षण संचालक (योजना) डॉ. महेश पालकर यांनी काढलेल्या परिपत्रकानुसार, अशा निरक्षर प्रौढांनी ज्या शाळेतून नोंदणी केली त्याच शाळेत त्यांची परीक्षा होणार आहे. १५० गुणांच्या या परीक्षेत वाचन, लेखन आणि संख्याज्ञान या घटकांवर प्रत्येकी ५० गुणांचे प्रश्न असतील. उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक घटकात ३३ टक्के गुण आजी-आजोबांना मिळवणे गरजेचे आहेत. तर परीक्षकांना पाच वाढीव गुण देण्याची तरतूद आहे. विशेष म्हणजे, सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत प्रौढांना आपल्या सोयीनुसार ही परीक्षा देता येणार आहे. जिल्ह्यातील १४,७५४ जण ही परीक्षा देणार आहेत.

# आज नाशकात पाणीपुरवठा बंद; उद्या कमी दाबाने

**नाशिक | प्रतिनिधी**

महानगरपालिका आणि सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी पाणीपुरवठा विभागाकडून शनिवारी (दि. २२) तांत्रिक काम करण्यात येणार असल्याने संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. रविवारीही (दि. २३) कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी पुरेसा पाणीसाठा करून ठेवावा, असे आवाहन पालिकेने केले आहे. आज जागतिक जलदिन सर्वत्र साजरा होत असतानाच नाशिककरांना पाणीबाणीचा सामना करावा लागणार आहे.

स्मार्ट सिटी पान १० वर

# विधानभवन नव्हे, लक्षवेधी भवन

## मुनगंटीवार यांची टीका

**मुंबई | प्रतिनिधी**



विधानसभेच्या कामकाजात शुक्रवारच्या दिवशी तब्बल ३५ लक्षवेधी सूचना दाखवण्यात आल्या. लक्षवेधी सूचनांच्या विक्रमी संख्येवरून भाजपचे आमदार आणि माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार पुन्हा एकदा संतापले. आपल्या नावात जरी विधानभवन असले तरी ते आता 'लक्षवेधी' भवन झाले आहे, अशी टीका करत त्यांनी विधानसभेच्या कामकाजावर ताशेरे ओढले.

माथाडी कामगार विधेयकावर बोलताना मुनगंटीवार म्हणाले, कामगार कायद्यात बदल करत असताना आपण कामगारांना संरक्षण देता, तसे आमदारांनादेखील संरक्षण देणे आवश्यक आहे. कारण विधिमंडळ अधिवेशनात पान १० वर